सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः- निशाणी क्र.६२

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - दिलिप काकासाहेब गायकवाड,
वय - ४५ वर्षे, व्यवसाय- शेती/ पोलिस पाटील,
राहणार - नेवासा बुद्रुक, ता.नेवासा, जिल्हा -अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.चव्हाण यांचे मार्फत सुरुः-

फिर्यादीस मी ओळखत नाही. मालनबाई देवराव जाधव यांना मी ओळखतो कारण त्या आमच्या गावातील रहीवासी होत्या. सद्या त्या मयत आहेत. घटनेबाबत मला काहीही माहित नाही.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, मालनबाई जाधव यांचया नावावर असलेल्या जॉब कार्डचा वापर करुन सुभद्राबाई जाधव यांनी महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेवर काम केले होते. हे मला माहिती नाही की, सुभद्राबाई जाधव हिस आरोपी क्र. १ व २ यांनी मदत केली होती. हे मला माहित नाही की, मालनबाई ही मयत असताना देखिल सुभद्राबाई जाधव यांना मदत करुन आरोपी क्र. १ व २ यांनी शासनाची रक्कम रुपये ३,२६०/- रुपयांची फसवणुक केली होती. हे मला माहिती नाही की, फिर्यादी ज्ञानदेव गुरगुडे यांनी आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द फिर्याद दाखल केली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेबाबत मला माहिती असुनही केवळ आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे ॲड. बी.जी. झावरे यांचे मार्फत नाकारला.
उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे ॲड. आर. एम. मुंगसे यांचे मार्फत नाकारला.
उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक- ०७/०४/२०२५.